दिनांक २०/०९/२०२३

# प्रसिध्दी पत्रक

**आ.लो.से. श्री. 1) श्री. दिलीप गमजू गायकवाड, वय 43 वर्ष धंदा- नौकरी, पद- ग्रामसेकवक, नेमणुक-ग्रामपंचायत- मौजे मालुंजा (खुर्द) ता. गंगापुर जिल्हा औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन रुपये 8000/- लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे क्रांतीचौक ओरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | श्री. दिलीप गमजू गायकवाड, वय 43 वर्ष धंदा- नौकरी, पद- ग्रामसेकवक, नेमणुक-ग्रामपंचायत- मौजे मालुंजा (खुर्द) ता. गंगापुर जिल्हा औरंगाबाद |
| लाच मागणी रक्कम | 10000/- |
| लाच स्विकृती रक्कम | 8000/-रुपये |
| तपास अधिकारी | श्री. सचिन साळुंखे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | रमाई योजना अंतर्गत घरकुल मंजुरी मध्ये कोणतीही त्रुटी न काढता सदरची फाईल पंचायत समिती गंगापुर येथे मंजुरीकरिता पाठविण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे मौजे मालुंजा (खुर्द) ता. गंगापुर येथील रहिवाशी असून त्यांच्या वडिलांचे नावाने रमाई योजना अंतर्गत घरकुल मंजुरी मध्ये कोणतीही त्रुटी न काढता सदरची फाईल पंचायत समिती गंगापुर येथे मंजुरीकरिता पाठविण्यासाठी आ.लो.से. श्री. दिलीप गायकवाड यांनी १००००/- रुपयाची लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>फिर्यादी यांचे तक्रारीवरुन दि. 18/09/2023 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्री. दिलीप गायकवाड यांनी फिर्यादी यांना 10000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले बाबत निष्पन्न झाले.<br><br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि. 20/09/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता आ.लो.से. श्री. दिलीप गायकवाड यांनी तडजोडी अंती लाचेची रक्कम 8000/- रुपये पंचासमक्ष स्विकारली. लाच स्विकारल्यानंतर नमुद आ.लो.से. यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे क्रांतीचौक,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री सचिन साळुंखे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार साईनाथ तोडकर, केवलसिंग घुसिंग, चालक सी.ए.बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 8668752530

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद.